लातूर समाचार
LATUR SAMACHAR

# सायबर वॉरियर्स'च्या मार्गदर्शनाखाली शिवाजी माध्यमिक विद्यालय, औसा येथे सायबर सुरक्षा कार्यशाळा



**लातूर/प्रतिनिधी** : राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर व क्विक हिल फाऊंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा या उपक्रमांतर्गत शिवाजी माध्यमिक विद्यालय, औसा येथे सायबर सुरक्षा कार्यशाळा घेण्यात आली.

'सायबर वॉरियर्स' ओमकार सूर्यवंशी व अर्जुन चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना सोशल मीडियाचा सुरक्षित वापर, फिशिंग मेसेज ओळखणे, पासवर्ड सुरक्षा, ऑनलाइन फसवणूक प्रतिबंध, तसेच सायबर गुन्हे नोंदणी व हेल्पलाईन १९३० याबाबत मार्गदर्शन केले.

शाळेचे मुख्याध्यापक श्री. अभिमन्यू जंगाले, शिक्षकवृंद श्री. नागनाथ चिट्टे, श्री. सुभाष लोकरे व विद्यार्थी उपस्थित होते. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये डिजिटल जबाबदारीची भावना जागृत झाली असून ते आता इंटरनेटचा अधिक सावध व सजगतेने वापर करतील, असा विश्वास उपस्थित शिक्षकांनी व्यक्त केला.